नि.फौ.ख.क्र. १५६/२०१६
सरकार विरुध्द दिपक व इतर
निशाणी क्रमांक –९०.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –
माझे नांव – सत्यनारायण दत्तु सोनवणे,
वय – ३२ वर्षे धंदा – नोकरी,
रा. शिक्षक कॉलनी, अहमदपूर हा.मु.पुणे.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.आर.एल.शिंदे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** दि.२६/०८/२०१६ रोजी पोलिसांनी मला लातूर–नांदेड रोडवर वैभव लॉज येथे पंचनाम्यासाठी बोलाविले होते. त्यावेळी दुसरे पंच मोहम्मद देशमुख हजर होते. घटनास्थळ फिर्यादी मंगेश जाधव यांनी दाखवले. त्याठिकाणी आमचेसमक्ष घटनास्थळाची पाहणी करण्यात आली. त्यानंतर घटनास्थळाचा पंचनामा तयार करण्यात आला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्याला **<u>नि.क्र.९१</u>** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.बी.डी.जाधाव यांच्यामार्फत सुरुः–</u>**

**०२.** घटनास्थळाचे बाजूला माझे दुकान होते, म्हणून पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी बोलाविले होते. दुसरे पंच मोहम्मद देशमुख माझे दुकानात मेकॅनिक म्हणून काम करीत होते. पंचनामा ९.१५ ते ९.४५ चे दरम्यान करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचे सांगण्यावरुन घटनास्थळावर पंचनामा केल्याचे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझेसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक –०९.०७.२०२६